
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४९३



# तुषार

REFBK-0024041
REFBK-0024041

कवि बाळकृष्ण ध. पुरव

# तुषार

## ( काव्य संग्रह )

- कवि -

बाळकृष्ण ध. परब

: प्रकाशक :

कु. बा. कृ. वेंती

शिवशक्ति प्रकाशन

C/o. वेंती टेलरिंग इन्स्टिटयूट

महागिरी जि. ठाणें.

: मुखपृष्ठाचे डिझाईन :

शुक्राचार्य गायकवाड

: प्रथम आवृत्ती :

६ मार्च १९८३

मुल्य आठ रुपये

# ऋण निर्देश –

आज माझा तुषार हा काव्यसंग्रह प्रकाशित होत आहे. माझ्या हितचिंतकांचे मला वेळोवेळी सहाय्य झालें त्याबद्दल त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

सुप्रसिद्ध मराठी साहित्यिक कवि म. पा. भावे यांच्या समर्थ प्रस्तावनेबद्दल मी त्यांचे आभार मानतो. माझ्यासाठी श्री भावेनी वेळात वेळ काढून काहीही आढेवेढे न घेता माझ्या "तुषार" काव्यसंग्रहाला प्रस्थावना देऊन मला उपकृत केले आहे याबद्दल मी त्यांचा अत्यन्त ऋणी आहे.

वैती ताई यांचे प्रकाशन आणि वरद हस्त माझ्या "तुषार" ला लाभला हे मी माझे मोठें भाग्य समजतो त्या बद्दल मी ताईचे आभार मानतो.

वेळात वेळ काढून शुक्राचार्य गायकवाड यांनी केवळ माझ्यासाठी मुखपृष्ठ डिझाईनचे काम स्विकारले या बद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

सहा मार्च रोजी गुरुवर्य स. वि. कुलकर्णी यांचा सत्तरी सत्कार समारंभ आयोजीत केला. मान्यवर कवि, लेंखक, विभूती या समारंभाला हजर रहाणार. अशी पर्वणी मला शोधुनही मिळणार नव्हती आणि वेळतर कमी, असं असताही ज्योती प्रिन्टर्स ने बरिच मेहनत घेऊन अल्पावधीत माझा काव्य संग्रह तयार करुन दिला त्या बद्दल मी त्यांचा आभारी आहे. घाई गर्दीत काही चुका राहुन गेल्यात तरी वाचक मला समजून घेतील. या काव्यात असलेली अमृताची मधु जनता जनार्दना चरणी अर्पण करीत आहे.

बाळकृष्ण ध. परब

देवाहुनही थोर अशी हि माता
अशी हि माता ।

मम हृदयीचे पुष्प पहिले
वाहतो तव चरणा ॥

REFBK-0024041
REFBK-0024041



माझी आई आनंदी धर्माजी परब हिच्या
चरणी माझा हा पहिला काव्यसंग्रह
"तुषार" सप्रेम अर्पण....

बाळकृष्ण परब

# प्रस्तावना

श्री परब हे कामगार क्षेत्रात काम करणारे परंतु हौस वा छंदापायी कविता लिहिणारे कवी आहेत. त्यांचा पहिलाच काव्यसंग्रह 'तुषार' या नावाने प्रसिद्ध होत आहे. त्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. या काव्यसंग्रहास मी प्रस्तावना द्यावी असा त्यांचा आग्रह दिसला. अर्थात ही प्रस्तावना लिहितांना माझ्या मनात एका उदयोन्मुख कवीचे कौतुक करुन त्याला प्रोत्साहन देण्याचीच प्रामाणिक भावना वसत आहे. यात कवीच्या काव्यासंबंधी परखडपणे काहीही लिहिण्याचे मी कटाक्षाने टाळीत आहे कारण प्रथमच 'श्री' काढणाऱ्या बालकाची 'श्री' ही ओबडधोबड, वळणदारपणा नसलेली अशीच असणें स्वाभाविक आहे. तेव्हां नवोदित कवीचा नवखेपणा, उत्साह ध्यानी घेऊनच मी हे चार शब्द लिहीत आहे.

वेळेच्या अभावी मला श्री परब यांच्या या संग्राहातील सर्व कविता वाचण्याची संधी मिळाली नाही परंतु ज्या काही कविता वाचल्या त्यावरुन श्री परब यांची कविता साधी, सरळ, सोपी आहे. त्यात विषयांची विविधता आहे. कवी वृत्तीनें सात्विक असल्याचेही जाणवते. निसर्ग, निरागस बालके, देव, दैव, तत्वज्ञान इत्यादि विषय त्यांच्या आवडीचे दिसतात त्यांच्या काव्यातला कवित्वाचा अंश खालील काही ओळीवरून ध्यानी यावा.

१) थेंब टपोरे मोत्यासम हें विखरुनि पडले इकडे तिकडे
( कविता– पांघरुण आले )

२) अंधाराचे जीवन आमुचे दूर करो हा रवि त्वरे
नको वंचना, नको शृंखला, पाश जडाचे दूर करे
( कविता - उठ माणसा)

३) छंद येती बंधन घेऊनि, अक्षरांची मृदु साथ लेवूनि
त्या साथीची सावळी न्यारी, जनता जनार्दना अर्पितो सारी।
(कविता - साद घालितो कुणी)

'समरस' ही कविता रचनेंच्या दृष्टीने बरी असली तरी वृद्धावस्थेसाठी आतुरतेनें वाट पाहणे ही कल्पना विशेष रुचणारी नाही.

तसं पाहिलं तर कविता या क्षेत्रात वाटचाल करण्यास खूप वाव आहे. काव्य रचनेची सफाई, विषयांची सुव्यवस्थित मांडणी, शब्दांची अचूक निवड, गेय काव्य प्रकाराची नीट तोंड ओळख व कल्पना प्रतिमांची सुयोग्य निवड इत्यादि गोष्टी चा पाठपुरावा कवीनें स्वतःच्या प्रगतीसाठी अवश्य करावा, एवढीच अपत्यपणें प्रेमाची सूचना.

या संग्रहातील छपाईतील चुका मात्र टाळावयास हव्या होत्या. पुढील संग्रहात हे घडू नये.

म. पां. भावे

# रसिकांशी - सुसंवाद

'प्रिय रसिकांनो,

नम्र अभिवादन करुन माझ्या "शिवशक्ती" प्रकाशना तर्फे प्रथम पुष्प म्हणून कविवर्य श्री बाळकृष्ण ध.परब यांचा 'तुषार' हा काव्यसंग्रह सविनय प्रकाशीत करीत आहे. सदर काव्य लेखनाची प्रेरणा त्यांना वयाच्या चौदाव्या वर्षा पासून झाली म्हणजे ते स्वयंभू कवि आहेत. त्यानी शालेय जीवनापासून काव्याचा छंद जोपासला व संग्रहांत केला.

परंतु ते काव्य पुस्तकरुपाने प्रकाशित करु शकलें नाहीत कारण शिक्षण संपताच दिशवितीच्या पोटाच्या खळगीसाठी अर्थाजन करणें क्रमप्राप्त होते. म्हणून त्यांनी चाकरी पत्करली, चाकरीचा प्रश्न सुटला. आणि पुन्हां ते काव्याकडे झुकलें, कवी हृदय काही स्वस्थ बसू देईना योगायोग असा की, त्यांची माझी प्रथम भेट लोणावळा येथे सहलीत झाली. त्या सहलीत त्यांनी श्री एकविरा देवी संबंधी एक सुन्दर कविता सादर केली. ती कविता मला फार फार आवडली तेथेच त्यांच्या कवि हृदयाची ओळख पटली आणि 'तुषार' हा काव्यसंग्रह वाचावयास मिळाला. त्यातील सर्वंच कविता अप्रतिम व हृदयस्पर्शी असून मनाला संतोष देणाऱ्या आहेत.

त्या काव्याचा आनंद हा माझ्या पुरताच मर्यादीत न रहता तो चार भिंतिच्या बाहेर यावा. त्याचप्रमाणे आपण मिळविलेला आनंद इतरांनाही मिळावा ही भावना मनात आली. त्याच क्षणी मी ठरविले कीं, ह्या उमलत्या कळीला उमलण्यास संधी द्यावी ही कळी आधुनिक स्पर्धेच्या जगांत दडुन न जाता अशीच फुलुन जावी तिचा वटवृक्ष व्हावा त्या जनिणेचे प्रथम पुष्प 'तुषार' हा काव्यसंग्रह रसिकास सादर करी आहे.

रसिक मनःपूर्वक साथ देऊन त्याचे स्वागत करतील अशी मला खात्री आहे.

कु. बा. कृ. वैंती

# – तुषार –

मी उभा आहे इथे या खडकावर
हाजीअली देऊळाच्या मागे ॥
सागराचे तुषार पडत आहेत
माझ्या अंगन् अंगावर
त्यातल्याच एका खडका सारखा
मी ही स्थिर स्थितप्रज्ञ झालो आहे ॥
आणि हा दर्याराजा एकसारखा
हालवुन हालवुन मला जाया करत आहे ॥
सांगत आहे गूज आपलं
आपल्या उरात दडलेल्या रहस्याचं ॥
कितीक युगे जाहलित
मी असा फेसाळत आहे ॥
मोत्यांचे हे तुषार फेकत आहे
जीवनाचं दान देत आहे ॥
बांधत आहे जीवन माझं
देत आहे सारं देत आहे हसत ॥
आणि नेतो मात्र आपणाकडून
आपल्या देहावरचा सारा मळ ॥
स्थितप्रज्ञा येतं कधी कधी उचंबळुन
दाटतं ह्या जबात साचलेली सारी घाण ॥
एकदाची सारी धुवून न्यावी
सिमा ही धरती मिळनाची ॥
धुडकावुन मी येतो अगदी जवळ
पण मानवा माझं प्रेम तूला नाहिच समजत ॥
सभोवार मात्र माझ्या कडा ठोकून
मलाच बंधित करु पाहतोस ॥

ग्रंथ संग्रहालय
२४९३
२००७
काव्य ३१७७१
शाखा

# ॥ उमलु दे ॥

त्या कळयाना उमलुच दे सारे
तव हाताचे खुंट खुपसु नको त्यात रे ॥

उडणाऱ्या पाखरां दोरा कश्यास बांधतो
काळी ही करणी तुझी जगास का दाखवतो ॥

फुलांचा गंध न्यारा दुरुनच घ्यावा
खुपसुनी नाक सारे करु नये ख्व हा: ॥

सौंदर्याचा दु:श्मन म्हणूनी ठाकलासी जरी उभा
निसर्गाच्या चक्रामध्ये भस्म झाले सारे पहा ॥

# — ये घना —

ये घना तू रिमझिम बरसत
भिजवित भिजवित धरा अंबरा ॥ धृ ॥

तृषा लागली या ओठांना
जमिनीलाही तडे जाहले
उश्मा आता घासत मजला
मजला दे वारे, थोडे ॥ १ ॥

सुकले सारे सुकली हीरवळ
सुकले पंचहि प्राण माझे
घसा कोरडा डोळे लावून
तिष्टत आहे रे शिवे ॥ २ ॥

नको जाऊ रे घना इथूनी
रिते ठेवुनी मला, थांबना
तुझ्या करीची अमृत झारी
न्हाउ घालुदे मला जरासा ॥ ३ ॥

# - लक्ष्मी -

अहा लक्ष्मी पहा चालली
भरलेल्या शेतातुनी
सभोवाट तो पहा पसरली
गालीच्याची माणीक मोती ॥१॥

पहाता सारे मनी तियेच्या
आल्हादुनी शहारे उठती सदा
कोमल हस्ते कूरवाळुनी ती
विकास लावी हृदयी किती ॥२॥

गोफणीस दगड लावूनी
सहज फेंकी पाखरांवरी
थवा ऊडे तो चादर होउनी
गंमत मिळे पाहण्या अती ॥३॥

सारे भरले पूर्ण हृदयी
पूर्णत्वाने अवनी नाचू लागली
शेतकऱ्यांच्या कंठातूनी उमलती
सहस्त्र कमले वाहण्या लक्ष्मी प्रती ॥४॥

## –चक्र–

काय कुणाची असे शाश्वती
उदयाची नसें आम्हा भ्रांती
आज आला हा क्षण भाग्याचा ॥१॥
वर्पूनि कापा साठवू हृदया

काळचे सारे गडप जाहले
उदयाचे कुणी न पाहिले
चक्र सुदर्शन फिरवीत राहिल ॥२॥
मातीतुनि तो कृती करिल

चित्र विचित्र तो बाहुल्या करेल
गारुडी होउनी तया नाचवेल
चक्र हें सारे त्याचे आहे ॥३॥
रडतो मात्र आम्ही सारे

# -फरक-

साडेतीन हाताचा चुरगाळलेला देह
कोरड्या कुसळ्या वृक्षापरि
पडला आहे कसा तरीच
म्हारांड्याच्या पलिकडच्या दारि ॥१॥

जवळ मात्र काही नाही
अंथरुणही नग्नच आहे
डोळे लावूनी आकाशी
कुणाची बरे वाट पाहे ॥२॥

समोरच्या त्या पडवीत मात्र
धावपळ लेकांची दिसे अती
कोणी घेतला जन्म एक
कोणी आनंदे साखर वाटती ॥३॥

गुंडाळलेल्या फडक्यातुन
जगास पाहुन घेई किती
तोही गुंडाळला फडक्यात
पण फरक मात्र दोहोत अती ॥४॥

# -उदय होता-

कोवळी किरणे सुर्यांची आली हो द्वारी
भरुनी घ्या हो ओंजळीत साठवा हृदयान्ती ॥ १ ॥

अंधाराचा नाश जाहला
लपवुनी तोंड पळुनी गेला
हिंस्त्र स्वापदे रान धरिती
बाणापरि हे किरण टोचती ॥२॥

सहस्त्र बाण सूर्यापासुनी
निघुनी ग्रासिति दुष्टांसी
सुदर्शन हे फिरे भूमंडळी
आधार देई सकलांसी ॥३॥

मांगल्य सारे पहा भरले
तुडूंब जलहे असु लागले
अवनी खळखळ वाउ लागली
नटुनी न्याली किरणें न्हाली ॥४॥

# -रोपटे-

प्रितीचे हे रोपटे
लावीले मी मंदीरी
दवबींदु परि सिंचीले
हृदयी कवळुनी किती ॥१॥

वृक्ष वाढे त्याचा
शृंगारुनी पाना फुलानी
फुलुनी सर्द जाहाला
वाकुनी पाही जरा जमी ॥२॥

भरले सारे तुडुंब भरले
उणीव कश्याची अता नसे
प्रितीच्या ह्या रोपट्याने
घरदार सारे व्यापिले ॥३॥

# -मन भरती-

झुळझुळ' वाहुनी ओढे गाती
कणकांच्या बेटी वायु वसती
पाखरांच्या किलबिले जाग येई
तेथे माझिया मना ये भरती ॥१॥

कृत्रिमतेचा लवलेशही नाही
अथांग वात्सल्ये भरले जन ही
नभातुनी उमलती रंग नभाचे
अथांग भूवरी उठती कारंजे ॥२॥

पाठीवरुनी सदैव हात फिरे तो मायेचा
आशीर्वादात तियेच्या आनंद मिळे जगाचा
जीवनाचं हे चित्र चित्रीत केले अंतरी
सुगंध त्याचा दरवळत आहे हृदयी कितितरी ॥३॥

# -नारळी पौर्णिमा-

नारळी पौर्णिमा सण वर्षा तूझा
तूच आमूचा देव खरा ॥

देयी मोती आम्हा सदा
आम्ही लेकुरे तूझीच बापा ॥

आले ओटीत तूझ्याची राया
पिकवी आमुच्या धान्य घरा ॥

देई सुभदा देई प्रमदा
अर्पि आम्हा सुख सागरा ॥

हृदयी येती तूझ्या तारका
गाऊ नाचू सदा सदा ॥

# -उमलत आहे-

एक बापुडं फुल सोनुलं
उमलत आहे
मागडं उघड बोडकं रान
दुखवत आहे ||१||

उघडया माळावर ईवलसं झोपडं
वसत आहे
कोल्हे लांडगे तरस याना मात्र
सलत आहे ||२||

दिन मण्याने पलायन केलं
चोर हसत आहे
चंद्र उगवला रात्र फाकलि झालं
रडत आहे ||३||

विश्वाचं पारड फिराव व्हावं
आपुलेचि भले
मूर्खांचे हे समिकरण असतं
मरती मात्र भले ||४||

# -पांघरुनी आले-

छत्र नभोचे पांघरुनी हे
गडबडी आले लगबगी आले ॥

थेंब टपोरे मोत्यासम हे
विखरित पडले इकडे तिकडे ॥१॥

शांत वृक्ष हे शांत धरित्री
पिऊनी तोषती आपुल्या मुखी ॥

क्षण भाग्याचा कि जीवन पूर्तीचा
आला आला अलगद आला ॥२॥

मधुर गंधे उटणे लेवुनि
पृथ्वी माता पावन झाली ॥

तृणांकुराना प्रसऊ लावकि
हिरवी झाली हिरवी झाली ॥३॥

# -उठ माणसा-

उठ माणसा डोळे उघडुनी
जाग येऊदे अता तरी
झटकुनी टाकी झोप तूझी
पूर्व दिशा फाकली पहा ही ||१||

तांबडं फुटलं कडयावरी
ह्या दोन डोंगरामधी
कुजबुज गाऊनी पक्षी सांगती
निद्रावस्था ह्या जमा किती ||२||

सुर्य ऊगवला दिशा फाकली
रवि करे ही अवनी व्यापिलि
न्हाऊन जाऊ आपण हृदयी
हृदयी व्यापूदे प्रिती खरोखरी ||३||

अंधाराचे जीवन आमचे दुर करा हे रवि त्वरे
नको वंचना नको शृंखला पाश जडाचे दूर करे
नकोच मजला मीपण माजे सर्वच तू व्यापूदे
तुझ्याच करि गुंतवुनी कर हे आनंदे गाउदे ||४||

# ॥ रणक्षेत्री ॥

सीमा रक्षणासाठी सज्ज तूझा दादा खरा
सुर्याचे उन तुम्हा न लागो चंद्रशय्येत रहा
दुष्मन येऊनी गोळी झाडतो अमुच्या छातीवरी
बाळ प्रेम तरवीत आहे तुझीच माया खरी

बाजीराव ध. परब

तोफावरुनी तोफा येती
गोळया झाडुनी चालु लागती
आठवण होई बाजी प्रभुची
निस्वार्थ हृदयढाल अर्पिली जनताली ॥१॥

रणक्षेत्रावरी सज्ज असा मी
तळपत आहे तुमच्यासाठी
प्रखर ज्योतीने पहा ही कात डागीली
हाय ! डांगुनी ती निघुनि गेली ॥२॥

परि तमा ही नसे तयाची
तुमच्यासाठी दावीन उषा खचितची
रोखूदे दुष्मनाना बंदुकीची गोळी
सिमेवरूनच फेकिन त्याना भूतळी ॥३॥

# " साद घालितो कूणी "

मजला साद घालितो कुणी
या बेटातुनी या झाडितुनी
वृक्ष वेलितूनी दऱ्या दऱ्यातुनी
साद घुमती प्रतिसाद होउनी ॥१॥

आदळता ते देहावरती
रोमरोमी थे भरती
चिगारूनी उठे ज्योत हृदजी
हृदय स्रवे हो प्रिती ॥२॥

हि अद्भुती कि अनद्भूती
फिरवे पिसारा हृदयी अती
लाऱ्हांचा हा हृदयी गालिचा
पायघड्या पडती सदा ॥३॥

शब्द येती बंधन घेऊनी
अक्षरांची मृदु साथ लेवूनी
त्या साथीची साखळी न्यारी
जनता जनार्दना अर्पितो सारी ॥४॥

# ॥ मुग्ध बालिका ॥

वेचीत जा हि फुले
तू मुग्ध बालिका रे
हासूं तूझं हे विखरीत जाओ
फुला फुलातुनी रे ॥१॥

दवबिंदूचे तुषार पडले
कळी पाकळी खुलु लागले
हासुनी ते बघ बघु लागले
सवे तुझिया बोलु लागले ॥२॥

अजाण असतील फुले जरी ही
बोलत नसतील तरी तरी ही
अगाध मन आंदण लेवूनी
जशी अर्पिती प्रिती सारी ॥३॥

मृदु तूझा हा हात फिरता
मोहरुनी उठे सारी काया
पुलकित होऊनी हासू लागती
गळी तुझीया त्वरे बिलगीती ॥४॥

# – हांसरी मुळे –

फुले हासरी मुळे हासरी
क्षणांत सारे विसरुनी जाती
देता चापट गालावरती
हसूनी बसती किती ॥१॥

गाल फुगवूनी ओठ दाबूनी
तटस्थ होती मनी
नकाराचे व्रत घेऊनी
धूमे वागती जनी ॥२॥

परी चॉकलेट देता हातीं
क्षणात सारे भूलती
क्षणामागची रात्र अंधारी
क्षणात विसरुनी जाती ॥३॥

# – तूला पाहता –

तुला पाहता जीवन माझो रोमरोमी फुलू दे
मम हृदयातील तुच ईश्वर पूर्णत्वे मिळू दे
हळूवारही पंखुडी काया दवबींदू न्हाऊ दे
शरदाचं ते स्निग्ध चांदणं देहावर दे ॥१॥

मला नको हे जीवन माझं
तुझ्यातच हे पूर्ण रहावं
वटवृक्षाची सदैव छाया
सौख्य मिळो मज कामण्या ॥२॥

जीवन माझं सारं अर्पितो मम हृदयाच्या तुज ईश्वरा
तुच दाता होई वल्होरा नेंऊनी सोडी पैलतीरा
उधळत्या बैला आवरु कसे सूटे कासरा हातचा
निसटत्या ह्या सुन्दर क्षणाना तुची अर्पि मज मांगल्या ॥३॥

# ॥ समरस ॥

उद्याची भाकरी मिळविण्यासाठी
आईची केवीलवाणी धडपड होत होती ॥
डोळे उघडे ठेवून हे सारे पहात होतो
पहात होतो पण काहीच करु शकत नव्हतो ॥

कवी मुनींनी वाखाणलेल्या बालपणाचा
तिटकारा आला एकदम सारा ॥
असतं ययातीसारखं मंत्र सामर्थ्य
तर क्षणात पालटलं असत बालपण सारं ॥

घेतलं असतं तारुण्याचं वज्र कवच
आणि फोडली असती सारी ढोकळ फटाफट ॥

ज्याची आतूरतेने वाट पहात होतो ते
माझं प्रेमी यौवन मला बोसडून वहावत होते ॥

पण हाय ! वृक्षाला आलेल्या फळा फुलांचा
त्याला नसता भारच व्हायचा ॥
माझंही तसच झालय हाताव आलेलं यौवन
काटचा सारखं बोचत आहे कणन्कण ॥

गाढवावर लादलेल्या ओझ्या सारखा
भार मात्र पडला आहे शिरावर सारा ॥

आता खरच सांगतो हे काही पेलवत नाही
प्रतीक्षा करतो सुन्दर त्या वृद्धावस्थेची ॥
गॅलरीच्या टोकावर सुन्दर रोपट्यांच्या शेजारी
हलत्या खुर्चीवर झोपाळत दिवस रात्र सराबी ॥

परंतू अचानक काळ्या केसांत एखादा पांढरा दिसावा
तसाच प्रश्न उठतो आहे उचंबळून एकदाचा
कि त्या जीवनात तरी समरस होईन का ? ॥

# — सौख्याची बारात —

तुझ्या केसांत ग केवडा फुलला
त्या धुंदीनं धुंद मान केला ।।धृ।

भ्रमरापरी ग मत माझी झाली
सोडुनी जाऊ आता कुठे मी
तुझ्या नादाने झाले मी गुंगी
मानसोक्त तुझा स्वाद घेऊनी ।।१।।

क्षणच कापूनी जीवन सरावे
जीवन गतिमय होऊनी जावे
मधू तयाची चाखत असतां
मन मावंदे भरो सदा ।।२।

विश्वाची तु मन मोहिनी
मम सौख्याचं लेणं ठेवूनी
आलो धावत नाचत फुलवत
जीवनाच्या सौख्याची बारात ।।३।।

# —दवबींदू—

पातीवरच्या दवबींदू तूज
काय हवे रे काय हवे ॥

तूझ्या मनी जे गूपीत वसे सज
सांग मजला सांग रे ॥

कण मोत्यासम अलवद हे बघ
कुणी बसवीले तूला बरे ॥

कोंदणातील ही नक्षी सुंदर
कुणी चोरीलि सांग सजे ॥

चोरुनी हे बघ ठेवू नको राज
मुग्ध करी तू सकले ॥

तू विश्वाचे रुप असे एक
जाणुनी घेई हृदये ॥

# -जीवनाचे दान-

सरसर आली लगबग सरही
क्षणांत विरुनी गली
काय कश्याची घाई न होजला
कोण आवरील बायी ॥१॥

कृष्ण वर्ण हा मेघ एकला
शुभ्र नभावर पातला
भासे क्षणभरी प्रवास माझ्या
गोवर्धनच हा चालला ॥२॥

थेंब टपोरे मोत्यासम हे
विखरीत मोती चालले
घ्या बाळानो ओंजळीत घ्या
जीवनाचं हे दान आपुल्या ॥३॥

# -पोळ्या बैला-

तु मस्त पोळका पोळया बैला
आदवा तुज लगला
गुरकत गुरकत सैरावैरा
जमानी देतो हादरा ||१||

शिंगानी तु वारुळ उकरनी
क्रोध डोळिया दावी
उग्र तुझें हे रुप पाहुनी
चळचळ कापे मनी ||२||

शक्तीचे हे वरदान बैला
अजरामर नसे जाण पां
उचंबळुनी जरी मारशील उड्या
उद्या जरे होशील विकलांगा ||३||

# ॥ उंच ठाकलेल्या पहाडा ॥

ह्या उंच उंच ठाकलेल्या पहाडाला
काय बरं सांगायचं असेल
उंच उंच होत गगनाला गवसणी
घालण्याचे स्वप्न तर पहात नसेल ॥१॥

कदाचीत खोलच खोल वसलेल्या
दरीला हिणवत तर नसेल ना ?
असं जर असेल पहाडा
तर तुझी घडणत नाही ॥२॥

गगनाला गवसणी घालता घालता
त्या कावळया सारखा रक्तबंबाळ मात्र होशील
आणी दरीच म्हणतील तर
तीच्यामुळेच तुझी उंचता मनात भरते ॥३॥

हा विचार मनात न करता
गर्वाने जर फुगत जाशील
तर एक दिवस ईशपूत्र
नचीतच तुला मूळातून उखडून टाकतील ॥४॥

# .... हुंकार ....

माझी कविता तुला सांगीतली
तु फक्त हुंकारच देत राहीलीस
जशी एखाद्या राजाराणीची गोष्ट
माझा साफ हिरमोड तु केलास
तुझ्या कडुन माझी फार अपेक्षा होती
माझ्या जीवनातील चढाओढीचं
सारं चित्रण त्यात रंगवलं होतं
पण तुला त्याची जाणच नव्हती
किंबहुना तुझं मन दुसरीकडेच होतं
आणी ओठ मात्र अलग होत होते आपसुकच
एकाद्यानं आपलं सारे जीवन उघडे करावे
आणि दुसऱ्यानं तेही आपल्याच माणसानं
मात्र निर्वीकारपणे ऐकून घ्यावं
काय म्हणाव तुझ्या ह्या ढोंग्या वृत्तीला
कि आलीस माज्या दुःखातच भर घालण्याला

ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४९३
२२०४१
काव्य ३।११।८३
(स्थळ प्रत)

# – उडुनी जा –

भ्रमरा उडुनी जारे दुरी
पुन्हां पुन्हां कर नको ही जवळी ||धु||

सांग सांगुनी तुला मी दमले
तरीहा तु टाकीतसे पाउले
फुलले नाही पुरते अजुनी मी
गंध न भरेला अजूनी माझ्या मनी ||१||

चोंचट नजर टाकुनी मज तु
बेजार करिसी किती हे सांगु
रंग नभीचा लेउनी आले
ठुमकत ठुमकत या भुवरे ||२||

जीवनातील स्वप्न बापुडें
ठरवीत होते मने
परी चिरडुनी जाईल क्षणात माझें
तिष्ण तुझीया करे सावरे ||३||

लुस लुषीत ही पंखुडी काया
बंधाचोही पडेल साया
येइल माझा ईश न्यावया
अलगद शिरहे ठवीन पाया ||४||

# — रांगोळया —

राखेनें आजपर्यंत मी कितीतरी
रांगोळया काढल्या आहेत
सुंदर सुंदर देखावे
देवळें सारे चित्रीत केले आहे
लोकांचे स्तुतीचे शब्द
माझ्या रोमरोमात स्फुतित होते
माझ्या साठी सारे
जीवकी प्राण होत होते
रांगोळयांच्या नगरीत
राखेने कमाल केली होती
पाठ वर फिरत होते हात शाबासकीचे
आणि वक्षिसानी हात भूषवित होते
पण तो दिवस उगवला
किती काळा कुट्ट
माझे हे हात घेउन गेला
एका छोटयाश्या दुखण्यात
आता कोणी फीरकत नाही
बघीतल तरी न बघीतल्या सारखे चालत आहेत
आता दुर राहीलीराखेची रांगोळी
माझ्याच जीवनाची होत आहे राखरांगोळा।

# - जाणीव -

मी उभा ईथे वृक्षाच्या बाजूला
येणारी जाणारी नजरा सदाच पहात असतो
आज कृश शरीर माझे दिसते केरम्या झाडापरी
पण त्यातही होती कधी वसंताची बहार ॥१॥

झटकन सारे विसरुन गेले अस्तीत्व माजे जगातले
वावटळीच्या पाचोळयाबरोबर जीवन माजं विसरुन गेले
आज माझे हात पुढे, एका पैशाच्या प्राप्तीसाठी
पण असूनही मी उभा इथें, जाणीव त्याची कुणा नाही ॥२॥

# ॥ धरतीचा बहार ॥

या धरतीची आम्ही लेकुरे गाऊ आनंदे
झुलत राहुदे डुलत राहूदे सारे विश्व इथे
समानतेचे वारे वाहुदे नद्या नाले भरूदे
पूर्णत्वाने जीवन व्यापुदे पुर्णत्वे वसुदे ॥१॥

दुःख नको हे स्पर्शो कुणा
खिन्नता पळो दाही दिशा
फळाफुलानी वृक्ष डोलुदे
गावो जीवाचे जीवन गाणे ॥२॥

प्रेम वाहुदे प्रेम व्यापुदे
व्यवहार होवो सदा प्रेमे
दुष्ट मनाला नष्ट होऊदे
स्नेंहलता बहरो वनें ॥३॥

# - माझ्या परड्याच्या दारी -

माझ्या परड्याच्या दारी
चाफा फुलला हो शेजारी
गंध त्याचा हा दरवळला
चहु बाजुला पसरला ॥१॥

केळयांचे हे बन आहे हो शेजारी
विहीरीची मंगाई खुलविते खळी
पसरले शेजारी बकुळीचे वृक्ष महान
छायेत तयाचे भागे अमुची तहान ॥२॥

छोटी माजी छबू उठते सकाळी
पडलेली फुले वेते ही ओंजळी
उभा असतो कधी त्याच मी दारी
पहाताच मज देई फुल लावण्या उरी ॥३॥

# — स्वप्न —

दोन फुलांचे स्वप्न होते
उमलत होते उमजत होते
काय तयाना ठाऊक परि ते
वादळ वारे धावतात हे ॥१॥

दवबिंदुचे तुषार अंगी
रोमरोमी पुलकित करिती
दुडुदुडु मन हे धावे पुढती
दो नयनांचे नाते जुळती ॥२॥

मस्तित दिन हे कसे ढकलती
दोन बापुडी फुले अजाण ती
सोसाटयाचा वारा एक दिन
भंगुनी गेला स्वप्न दोन ॥३॥

# — किड —

तीर कामठं हाती आमुच्या बाण
चौफेर फिरवुनी करितो दाणादाण
किड लागली समाजास या
पोखरुनी बनविते ओ ऽ ऽ ऽ - ढोल ||१||

ताठा तयांचा मोडुनी काढण्या
मारिन मी घण घणा
शुद्ध ठेवण्या मनमंदिर हे
कशास लावता धूप निखारे ||२||

मनकी बात मनही जाणे
बुरखा काढुनी पहावे
तीर माझा रामबाण हा
मर्म भेदुनी जाईल पहा ||३||

# — सुप्रभाते —

वंदन करितो सुप्रभाते आम्ही बालक तव चरणी ॥धृ॥

भेदूनी पडदा काळोखाचा
जीवनदायी तू मन्मंगला
सहस्त्र नेत्रे धालूनी कवळीशी
चराचराला जीवन देऊनी ॥१॥

देवी तू मज भासे मंगला
स्तवन तुझें मी करितो सदा
दिवा रात्रीचे रम्य तुषार
फुलवीत जाहलीस तू अमर ॥२॥

अमरतेचा वर तुला हा संजीवन लाभला
धेाी लोळण होती पावन स्पर्शूनी तव चरणा
तुझ्यात स्फुरले तुझ्यात व्यापीले सारे जग इथे
तूच चालवीशी तूच नाचवीशी साऱ्या जगा इथे ॥३॥

# — रखवालदार —

भारत मातेचे पाईक होण्या भाग्य भाला लाभले
पुलकीत जहाले जन्मा येऊनी काया वाणी मने ॥
उरात दडले मातेच्या या जीव आक्रंदीत
सरसावुनी हे बाहु पेटके ओकीत अग्नीवर्षाव ॥१॥

तोषवुनीया जीवा दिला दिलासा मनी
मातेच्या या उत्तर क्षेत्री वास्तव्य मी करी ॥
रखवालदार या सिमेचा ठोकत आहे गर्जना
षंढानो जर पूढे याल तर खेचीन तुमच्या जीव्हा ॥२॥

संगीन माझी परमप्रिय ही सोबतीण माझी
मातेच्या शत्रुसाठी ही माझी तुळजा भवानी ॥
कितीक आसूरा धाडीले यीने यमसदनासी
देश रक्षण कार्यासाठी जाहली व्रतवासी ॥३॥

# – एकांत –

हें फूल सोनूळें
किती चिमुकलें
इथे उमललें
इथे उमललें ॥१॥

या कपडी आड
डोळीया पाड
कसे उमललें
कसे उमललें ॥२॥

बाड बाजूला
नेंऊनी याला
कुणी बसविले
कुणी बसविले ॥३॥

भराही ही जीवनाची
लोपीली का मनी
एकांताच व्रत घेऊनी
उमलले का वनी ॥४॥

ये चल बोट धरी
फिरनी येऊ जगातरी
खिन्नता तूझी सारी
दूर जाओ दूर त्वरी ॥५॥

# .... गोव्याच्या भूमीत ....

माझ्या गोव्याच्या भूमीत घेता
पाताळ नगरी ती हिच भासे
डोंगराच्या कुशीत लपेटती
नारळ पोफळीच्या बागा रती ॥१॥

बेट चिमुकले खेळण्यातले
पाण्यावरी हे तरंगले
कि वाटे आली अप्सरा
घेऊन इंद्रपुरीचा थाट सारा ॥२॥

मैदानाचा भाग अफाट हा
समृद्धे डोळण घेतो पहा
विज्ञान संस्कृती निसर्गाची एकता
एकवटूनी इथे आली बता ॥३॥

# ।। हे स्वप्न माझं मालवू नको ।।

हे स्वप्न माझं मालवू नको
जीवनाच्या वेलीवरचे पुष्प बापुडं उखडू नको ।।

धगधगता हा ग्रीष्म बोचतो
काळोखही हा पुरवी डरतो
मनात माझ्या भयाण भरतो
चक्री वादळात सोडुनी मजला जाऊ नको ।।१।।

शहारले मी स्पर्शं तुझीया
लहारले मी साथ तुझीया
लहरत्या जीवनास माझ्या
वादळात सोडूनी तू जाऊ नको ।।२।।

निष्ठा माझी दुःखवू नको
श्रद्धा माझी हरवू नको
काही अन्य मज काही नको
माझ्यातील मज तू फसवू नको ।।३।।

# – अवखळ वाऱ्यात –

अवखळ वाऱ्यात छत्रीसारखी गत तुझी जाहली
छातीवरचे पक्षी दोन तु लपवतेस तरी किती
पदर उरावरी लपेटून तु घेतेस कितीदा तरी
परि नकाराचे व्रत तयानी आज घेतले असेची ॥१॥

झांबाउनी तु पहातेस ईकडे तिकडे चोहीकडे
चपलता तुझा नयनांची मज विलोभनीय वाटे
घट घेउनी डोही नी कडेवरी चाललीस तु घरी
कशी परिस्थीती एकवटली आली वाटे तुझीया तरी ॥२॥

सदू ममातुनी वाटते ग कीव करावी तुझी जरी
तरी नयन आपसुकच वळती तूझीया देहावरी
कशी बनवीली कोरुनी नक्षी तूझीया देहावरी
ओतूनी सारी कला मनीची साकारीले तूजला तरी ॥३॥

ढील कशाला घालतेस तू तूझीया सुन्दर रुपाला
तूडुंब भरली नदी पूराने वाहूदे दाही दिशाना ॥

# .... उभी साजणी वनी ....

केशकलाप सोडूनी हा उभी साजणी वना
कोण तुला गे काय म्हणाला सांग मजला झणी
नक्षत्रांचे रुप तूझं हे नक्षत्रच जन्मलें
तया झाकण्या कोण जन्मले ह्या भवनी आपूलें ॥१॥

खिन्न तूझी ही मूद्रा पाहूनी तळमळ उठे मनी
काय दशा ग होऊनी बसली तूझी ही साजणी
स्थीरावली ही नयनांची पापणी
नीश्चल काया जाहली झणी ॥२॥

कि प्रतीक्षेत तूच तीष्ठत केलें नर पामरे
कि हुर हुर लावूनी सुखे गेली परे
स्तब्ध जाहले वायू मंडळ फिरकत नाही इथे
सुर्य तेजही लोप पावले सोडूनी तूज हे असे ॥३॥

# – बांधावरो –

गोर गोमटी नार उभी मी भिजले बांधावरी
चीपकूनो बसलं पातळ माझं माझ्या स्थनावरी ॥

वरुनी झरतो पाउस झरतो माझ्या देहावरी
चिंब जाहले हिवाळे कापते जाउ मी कुठवरी ॥

नार अशी भी वाट दिसेना धुकं हे पडले परी
सागरमय हे सारे पसरले काय मी करु तरी ।

पायाखालूनी माती ढासळे पाय मी ठेवु कशी
तीर दिसेना पैलतीरी मी जाउ हो सांगा कशी ॥

रात किडयांची किरकिर होते भयहा दाटे उरी
काळोखाचे हात पसरले पहा हे दुरवरी ॥

चकोर चंद्रा आळवुनीया नीपचोत पडला घरी
गीत माझ्या हृदयातील हे ऐकवु किती तरी ॥

# - दिवस हे दिवाळीचे -

शुभ शोभीवंत ही दिवाळी आली
घरोघरी दिपमाला प्रज्वलति झालि
चैतन्याने आज हे सजले
सारे सारे मनी तोषले ॥१॥

पाहता अवनी हर्ष भरे हा
हिरवा शालू सजला पहा हा
खग आकाशी स्वच्छंदी विहरती
गुरें वासरें आनंदे तोषले अति ॥२॥

गोफ विणता गोपाळ गाती
समृद्धीचे प्रतीक असती
फळभारे तरु वाकती
नमन करण्या सृष्टिस किती ॥३॥

दिप काजवे चमकुनी बघती
सृष्टी नटली सजली किती
प्रतीस्वर्ग हा असा अवतरला
एकवटूनी सारे घेऊनी आला ॥४॥

खिन्नतेची एकही झळ नसे
येओ हे जीवन पुन्हां पुन्हां असें ॥

# ॥ बांडगूळ ॥

मरमरेस्तो काम करायच इथे ह्या मशीनीवर
पण त्याची जाण आहे कुणास !
खिळले हे नयन स्थिर जाहलेंत पाय
अचेतन हा देह मनही गेलंय मरुन
फक्त चौत्त एकेच ठायी ह्या मशिनीवर
कितीक वर्षं हे असेच जीवन जगतोय आम्ही
आता त्याची सवयच झाली म्हणा देह ही यंत्राच झालाय
कळू लागलाय अंगाला समजूनही उमजत नाही
टीचभर पोटाच्या खळगेपायी शृंखला ही तोडवत नाही
चतकोर टाकावा श्वानापूढे त्यानें तो बेलपत्रावानी झेलावा
घाण्याला बांधलेल्या बैलासारखं काकूं करायचं नाही
कधीं दया आली तर आणखी असाच एक भिरकवावा
तीच गत आमची आमच्या बांधवांची वर्षांनुवर्षं होत आहे
उलाढाली होवो कितीही राज्यात काळे येवो पांढरे येवो
आमचं हे जातं गरगरतच आहे पिठाशिवाय
एक दिवस असा येईल कामगार कोण हे दाखवून देयील
झाडावर पोसलेल्या बांडगुळास उखडून काढून फेकून देयील

# .... रमा ....

पलीकडची रमा आज मेली आहे
पण कुंथण्याचा आवाज मात्र येत नाही
नाही म्हटल्यास एक कुत्र केकाटत आहे
फारच जीव लावला होता बिचारीन

तसं पाहिलं तर रमा वांझंच होती
आणी नवऱ्यानंही कुठल्याश्या दुखण्यान
वरचा रस्ता धरला होता

पण किव येते बिचाऱ्या रमाची
कुणीही आगा पीछा नसताना
सपत्तीचा डोंगर रचला आहे
तो आता नीश्चल योग्यासारखा
कदाचीत मनात अश्रू ढाळत आहे

लोक म्हणतात सुटली एकदाची ब्याद
सगळ्यांशी अरेरावी आणी
शिव्या वाहुन विटली होती जीभ

सुटली हकदाची मरणाने पण प्रश्न आता गहन आहें
ह्या कुजत घातलेल्या मढयाला हात कोण लावणार आहें

चार मढी बसलित पायरीवर कराकरा वाजवत
दांत विचकून आपापसात काहीतरी म्हणत आहेत
कदाचीत रमाच्या नावानें शिव्याच देत आहेत

# — जाऊ नको रे दूर —

सोडुनी मज साजणा जाऊ नको रे दूर
वटवृक्ष च्या छाये मधूनी लोटू नको मज दूर ॥धृ॥

जन्म दिला तू प्रित पुष्पाला
दाही दिशांना सुगंध भरला
फुलावनी हे स्वप्न आले उमटू दे हे सूर ॥१॥

सूरात सूर मिसळूनी गाऊ
दोन जीवांचे स्वप्न गुंतवू
वास करण्याचो अता आपणा हेच आपूले घर ॥२॥

भंग होईल दंग हे सारे
मूर्ती वीना मंदीर कारे ?
पाषाणाला तडा जाऊनी उमटू दे एक झार ॥३॥

तृषा मनीची शांत होऊदे
शांतच वारे शांत वाहुदे
मन्मंगल हे पुज्य ठेवण्या लोटू नको मज दूर ॥४॥

आपुल्या हाती भस्म करूनी
काय पाहशील ही अवनी
मृगजळाच्या मागे लागूनी जाऊ नको रे दूर ॥५॥

हा आदर हा विश्वास
देऊ नको रे तडा वयास
भंगलेल्या विश्वात कसा होशील तू स्थीर ॥६॥

# — देवासम —

देव्हाऱ्यातील देवासम मी मानू कसं तुज मानू कसं
मी तळफळले मी फडफडले तुझ्याच मागे धुंगीत झाले

तरीही तूला रे याद्च नव्हती
आपुल्या मागे कुणी चालती
धूंद मनाने धूंदी जाहला
स्वता:स सारे विश्व मानला ॥१॥

त्या विश्वाच्या किनाऱ्यावर
प्रतिक्षेत मी होते बसून
परी न ढळली समाधी तुझी
तुझीया दृष्टी मी नच दिसली ॥२॥

आता प्राण हे कंठीत आले
देहही पुरते ग्रस्तीत जाहले
सरली सारी जीवन सरीता
सरली पुरती देह पूर्तता ॥३॥

# — शिरडं —

पणंपणं मळलंय माझ्या अंगावरुन
शिरडं म्हणतात मला काही न कळून ॥

तांब्याभर पाणी वा: पोसाभर माती
कुणीच घातली नाही म्हणून मला भती ॥

तरीही मी वाढले रसरसले भरभरले
पण कुणीच केली नाही किव सारे जरी हे त्याले ॥

वसंताची बहार फुलवत होती जग सारे
दवबिंदूच्या तुषारात नहात होते सारे सारे ॥

फुलवत होते तारे फुलवत होते वारे
मी मात्र ह्या माळरानावर दु:ख मोजीत होते सारे ॥

हळुवाराचा हात कधीच फीरला नाही अंगावरून,
कि विचारपूसेचे चार शब्द कुणीच फेकले नाहीत दुरुन

कुणीही यावे बसावे राठ नखानी कुरतडावे
घायाळपण माझं न पहाता उडुनी दुसरीकडे जावे ॥

हे आता सोसत आहे फार वर्षापासून
जीवनाची ज्योत विझू पहातेय सारे हे कंटाळून ॥

# – मंदीराची उभारणी –

झाडावर लटकतय मधाचं पोळं
डोलदार बागावानी
फुत्कारत घुमताहेत
इवल्या इवल्या मधमाश्यांचे पुंजके ॥१॥

त्यांच्या श्रमाचा घाम
वसला आहे तिथे एकवटून
त्या मधूच्या रक्षणासाठी
साऱ्यांनी लावली आहे जीवाची बाजी ॥२॥

पलीकडच्या झाडाखाली दोन हुक्कर पोरं
खल करताहेत कट करण्याचे
नारळाच्या चुडत्यांना करकचून बांधताहेत
शेंडयाला लावून आग झपाझप चालताहेत ॥३॥

मधमाश्यांचं स्वाहा होत आहे अग्नि कुंडात
प्रतिकार पडला थोटा क्रुर पोरांच्या त्या घाळयात
अलगद एकानं कवटाळलं मधाचं पोळं हातात
झपाझप चालू लागले मधमाश्या बिचाऱ्या तळमळताहेत

मंदीर उभारलं जात आहे एकाचं दुसऱ्याच्या जीवावर
काही झालं नाही असंच समजून चारे होतात मात्र दूर

# – इथें गवसली –

इथे गवसली हाती माझ्या
ज्योत जीवनाची
स्थिर जाहले खांब माझ्या
आयुष्याचे क्षणी ॥१॥

लाल मातीच्या पडक्या भिती
पहारा करिती किती
काय कुठल्या काळास छाती
भेदूनी येईल क्षणी ॥२॥

नाहीं महाल राजाचा जरी
इमानी किती
जयाच्या कवेत निजता रात्री
भूते नष्ट होती ॥३॥

नाही भय कश्याचे मनी
कशी शांत शांती
डोयी खाली घेता विट एकुली
विचार जाती दूरी ॥४॥

मातीचे हें सौभाग्याचे लेणे
मज लाभिलें अती
साक्षी आहेत ह्या विखुरलेल्या
पडक्या वस्ती ॥५॥

# ।। नाचु आम्ही बालक सारे ।।

नाचू आम्हीं बालक सारे नाचु फेर धरुनी
नाचत नाचत गाऊ आम्ही ठेक्यामधली गाणी ।।धृ।।

पातुकलीचा खेळ संपला
उठा मुलांनो उठा अतां
सांज जाहली दिस सरला
निशे पहा हा शालू ओढीला

त्या शालूचा धरुनी किनारा डुंबुनी जाऊया स्वर्गसूखी ।।

नभांगणी हा शशि उदेला
सोबत घेऊन नक्षत्र माला
कुणा घालीली नभांगणाला
नक्षत्रांची रंगीत माला

त्या मालेंचा दोर धरुनी सुखात बुडूया सारी जणी ।।

ह्या जगतातील हेवेदावे
संपुन जाऊदे सारे सारे
आत्म्याने इथे आत्म पाहूदे
क्षणभर जीवनी आनंद व्यापुदे

आनंदाचे गुपीत सांगण्या जाऊ पृथ्वी सारी साजणी ।।

# कवीवर्य बाळकृष्ण धर्माजी परब



आम्ही लौकरच आपणांस कवी बाळकृष्ण ध. परब यांचा
अध्यात्मीक कौशल्याची कलात्मकता अर्पण करणार
आहोत. इश्वर भक्तीवर आधारलेला कवी
श्री बाळकृष्ण परब यांचा " आधार "
हा काव्य संग्रह लौकरच प्रकाशीत
होत आहे ...... शिवशक्ती प्रकाशन

★ सर्व हक्क ' शिवशक्ती प्रकाशन ' कडे सुरक्षित ★

पत्रव्यवहाराचा पत्ता — शिवशक्ती प्रकाशन
C/o. वंती टेलरिंग इन्स्टीटयुट
महागीरी ठाणें.